**परिपत्रक क्र. १५**

ऑडिट पूर्तता विभाग,
रयत शिक्षण संस्था, सातारा
दिनांक : १४-६-२०१९.

प्रति,
सर्वश्री. शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखा.

**विषय : बांधकाम ठेकेदारांची बिले अदा करताना घ्यावयाची दक्षता.**

संस्थेच्या शाखांमध्ये मुलभूत सोयीसुविधा निर्माण करणेसाठी सातत्याने वेगवेगळया प्रकारची बांधकामे चालू असतात. त्या संदर्भात ठेकेदारांनी शाखांना दिलेली बिले नियमानुसार आहेत किंवा कसे, याबाबतची कोणतीही खातरजमा न करता तसेच ती संस्थेच्या बांधकाम निरीक्षकांकडून तपासून न घेता, खर्ची टाकली जात असल्याचे आढळून आले आहे. पुढे त्या संदर्भात परीक्षण अहवालांमध्ये गंभीर स्वरुपाचे शेरे नमूद होऊन शासकीय कार्यालयाशी संबंधित अनेक गंभीर स्वरुपाचे प्रश्न निर्माण होत आहेत शिवाय त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी संस्था प्रशासनाचे कार्यबल अनाश्यक खर्च पडत आहे. तसे होऊ नये यासाठी या परिपत्रकाव्दारे आपणास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) ठेकेदारांनी दिलेली बिले शासकीय नियमानुसार योग्य त्या नमुन्यात, छापील स्वरुपात व आवश्यक तो मजकुर नमूद असलेली उदा. ठेकेदाराचा पॅन / टॅन कमांक, जी. एस. टी. क्रमांक, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक इ. अशीच असली पाहिजेत. ती तशी नसतील तर स्विकारु नयेत.

२) ठेकेदारास बिले अदा करणेपूर्वी ती संस्थेच्या बांधकाम निरीक्षकांकडून तपासून घ्यावीत. त्यांनी त्या बिलांवर **" ठेकेदाराने बिलामध्ये आकारलेले दर व नमूद केलेली मोजमापे मी स्वतः तपासली असून ती बिनचूक आहेत, सबब, सदरचे बिल अदा करणेस हरकत नाही, "** असा सुस्पष्ट शेरा नमुद केला असेल तरच ती बिले ठेकेदारांस अदा करावीत.

वरील दोन्ही सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा खर्ची पडलेल्या बिलांची संपूर्ण रक्कम व्यक्तिशः संबंधित शाखाप्रमुखांकडून व्याजासह वसूल केली जाईल.

सचिव
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी :
१) श्री. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
२) श्री. विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा.
३) श्री. विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, दक्षिण विभाग, सांगली.
४) श्री. विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहमदनगर.
५) श्री. विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग, पुणे.
६) श्री. विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे, पनवेल.
७) विभाग प्रमुख, जमीन/इमारत विभाग, कार्यालय, रयत शिक्षण संस्था, सातारा.